२४ जाने २००५

# भाऊसाहेबनगरला बक्षिस वितरण

**भाऊसाहेबनगर।** भाऊसाहेबनगर येथे कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धांचे बक्षिस वितरण आय.पी.एल खेळाडू अभिषेक राऊत, क्रिडा मार्गदर्शक मकरंद ओक, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशिनाथ दादा टर्ले, विश्वस्त विलास टर्ले, अजिंक्य वाघ, प्राचार्य सुधीर जगताप, श्रीकांत ढवळे, तानाजी पुरकर, प्रकाश साळे यांचे हस्ते करण्यात आले. स्पर्धात विजयी झालेले संघ पुढीलप्रमाणे - प्रथम वैनतेय विद्यालय, द्वितीय निफाड वॉरियर्स, तृतीय निफाड स्पोर्टस्-फाऊंडेशन, हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम ओझर मिग, द्वितीय ओझर टाऊनशिप, तृतीय चाणक्य स्पोर्टस् फाऊंडेशन भाऊसाहेबनगर. क्रिकेट प्रथम सुंदरी-सुकेणा, द्वितीय ए.जे. मास्टर्स सुकेणा, तृतीय आर्यन्स लासलगाव. कबड्डी प्रथम सिनियर कॉलेज सायखेडा, द्वितीय जय योगेश्वर देवगाव, तृतीय जनता विद्यालय नांदुर्डी आदींना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी श्रीकांत ढवळे, प्राचार्य सुधीर जगताप, क्रिडा विभाग प्रमुख मधुकर देशमुख, क्रिडाशिक्षक गोविंद कांदळकर, डी.के. मोरे, क्रिडाशिक्षिका धनश्री ताकाटे, गोरख सानप, राहुल पठारे यांनी परिश्रम घेतले.